# सुप्रसिद्ध व्हायोलिनवादक श्री. मिलिंद रायकर ह्यांनी गाजविलेली एक अविस्मरणीय संध्याकाळ



दिनांक ५ मे, २०१३ ह्या दिवशी संध्याकाळचे सहा वाजले होते. जगप्रसिद्ध Cal Poly Pomona, California ह्या महाविद्यालयाच्या एका अलिशान सभागृहांत रसिकांची खूप गर्दी झाली होती. भारतीय मंडळी तर त्यांत होतीच, परंतु अमेरिकन रसिक प्रकर्षाने दिसत होते. ह्या महाविद्यालयांत भारतीय संगीत देखील शिकविले जात असल्याने संगीत शिकणा-या विद्यार्थ्यांची ऊपस्थिती असणे स्वाभाविकच होते. सभागृहांत शिरल्यानंतर महाविद्यालयांतील विद्यार्थी येणा-या रसिकांची जातीने विचारपुस करीत होते. त्यांना काय हवे, त्याची नुसती विचारपूसच नव्हे तर आग्रह देखील करीत होते. बटाटाच्या बटाट्याच्या चिप्स पासून ते कोकाकोलापर्यंत आणि बिस्किटे अथवा पासून चॉकलेटबार ते कॅलिफोर्नियांतील सुप्रसिद्ध फळांच्या रसापर्यंत ही मुले आग्रह करीत होती. वास्तविकत: भारतीय संगीताच्या अशा कार्यक्रमास झब्बा-पायजमा अशा पेहेरावासह भारतीय मुले अशा प्रकारचा आग्रह करीत असती तर मला अजिबात नवल वाटले नसते. मात्र त्याऐवजी चीन देशांतील, अथवा कोरिया देशातील त्या महाविद्यालयांत भारतीय संगीत शिकणारी ती मुले (खरे तर बहुतांशी मुलीच) तो आग्रह करीत असल्याने नवलाचे रूपांतर चौकशीत व्हायला वेळ लागला नाही. त्यातून एका चिनी मुलीने मी तिच्याशी ’भारतीय संगीत’ ह्या विषयावर बोलतो आहे, त्याचा अर्थ मी त्यांतला जाणकार असा लावल्याने "Do you know what Raga Milind is going to play tonight?" असा प्रश्न विचारून माझ्या संगीतातील तोकड्या ज्ञानाची जणू
परीक्षाच घ्यायचे ठरविले असावे. तरीही असा प्रश्न विचारुन ही मुलगी मी मिलिंद रा यकरांच्या"आतल्या गोटांतला" असावा, असा विचार करते आहे हे पाहूनतर मला मी कधी नव्हे तो खूपमहत्वाचा वाटायला लागलो. मात्र मिलिंद रायकरांसारख्या जाणत्या संगीतकाराच्या तप:श्चर्येची विशेष ओळख नसतांनाही, औपचारिक शिष्टाचारांच्या ऊंबरठ्यांत न अडकतां, त्यांचा एकेरी ऊल्लेख करुन शेवटी ’ईश्वराच्या दरबारांत आपण सारे सारखेच नव्हे कां” असेही मला अजाणतेपणाने आणि अमेरिकन रितीरिवाजाच्या पायंड्याला स्मरुन दाखवून दिले असे मला वाटले आणि त्या निमित्ताने का होईना, आपल्या अंगावरचा "आम्ही कोण म्हणून काय पुसता?" अशा विचारांचा वर्ख ओरबाडून काढला आहे, असे मात्र मला उगीचच वाटत राहिले. वास्तविक तसे त्या मुलीच्या मनांत देखील नसावे.

एक मात्र खरे की जगाच्या पाठीवर कोणत्यातरी देशांत जन्मलेले ते सारे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी "संगीत" ह्या एकाच ध्वजाखाली मोठ्या आदबीने जमा झाले होते आणि श्री.रायकर आपल्या मैफिलीची सुरुवात केव्हां करतात ह्याची आतुरतेने वाट पहात होते.

कांही तांत्रिक कारणामुळे जाहिर केलेल्या वेळेपेक्षां मैफिलीला थोडा ऊशिर झालेला असला तरी रायकरांची फार वेळ वाट पहावी लागली नाही. टाळ्यांच्या गजरांत मिलिंद रायकरांचे स्वागत झाले. त्यांच्याबरोबर आमच्या लॉस-एंजेलिसचे एक ऊत्तम तबला वादक, हेमंत एकबोटे हे साथीला होते. ज्यांनी ज्यांनी हेमंत एकबोटे ह्यांचे तबला वादन आधी ऐकले होते, अशा श्रोत्यांमधल्या मंडळींना तर मैफिलीची सुरुवात व्हायच्या आधीच जाणीव झाली की आज आपल्या कर्णेंद्रियांची चंगळ आहे आणि आजची मैफिल १०० टक्के रंगणार! कारण मिलिंद रायकरांसारखा ’समजून’ वाजविणारा प्रख्यात अनुभवी कलाकार आणि हेमंत एकबोटे ह्यांच्यासारखा तबला-निपुण हा एक ’दुग्ध-शर्करा’ योग आहे. महाविद्यालयाच्या संचालकांनी त्यांचा थोडक्यांत आणि मुख्य म्हणजे पाल्हाळ न लावतां मुद्देसूद असा परिचय करुन दिला. त्यांचे प्राथमिक शिक्षण वडिलांकडे म्हणजे श्री. अचुत रायकर ह्यांच्याकडेच झाले. त्यानंतर श्री. वसंतराव कडणेकर ह्यांच्याकडे संगीताचे धडे घेतले. श्री. प्रोफ़ेसर एपी-डी-कोस्टा यांच्याकडून पाश्च्यात्य संगीतही ते शिकले. ते मुळचे गोव्याचे आणि गिटार वाजविणे ह्या श्रीगणेशापासुन, आज व्हायोलिनचे प्रख्यात वादक हा त्यांचा दीर्घ-प्रवास घडला तो केवळ वडिलांच्या ऊपदेशाचा भाग म्हणुनच!

अपेक्षेप्रमाणे मैफिल "गिअर" मध्ये पडली. व्हायोलिनच्या मधुर तारा झणकारू लागल्या. भीमपलासचे सूर रसिकांचे कान तृप्त करुन गेले. रायकर ह्यांची खासियत अशी की रसिकांना आपलेसे करणारे त्यांचे सुरुवातीचे वक्तव्य, रागाची माहिती आणि रसिकांना आदरपूर्वक विचारण्याची पद्धत, की ज्यांत "हा राग वाजवू कां? की आपल्याला हा राग आवडेल? अशा प्रकारची विचारणा केलेली असते. अमेरिकन मंडळींच्या पचनी पडणारेच त्यांचे वक्तृत्व होते.

एकच राग किती तरी प्रकारांनी वाजविता येतो ह्याचे खरेखुरे प्रात्यक्षिक त्या संध्याकाळी ऐकावयास मिळाले. रागाच्या कितीतरी निरनिराळ्या छटा असु शकतात हे जणू कांही त्यादिवसाचे वैशिठ्यच होते. रागाचा विस्तार ऐकल्यानंतर, “आता ह्यापेक्षां अधिक चांगले असूच शकत नाही” असा विचार रसिकांच्या मनांत येतो न येतो तोच ,त्याही पेक्षा अनोख्या अशा त्या रागाच्या छटा रायकर रसिकांपुढे सादर करतात.
एखादी व्यक्ती समुद्रकिनाऱ्यावर उभी असते, नजर पोहोचेल

तोपर्यंत फक्त समुद्राचे पाणीच पाणी दिसत असते आणि ते क्षितिजापर्यंत आहे ह्याची जाणीव होते. तेथे समुद्र संपला असे त्या व्यक्तीला वाटते. मात्र आपण तेथपर्यंत पोहोचलो की त्याही पलीकडे ते अथांग पाणी दृष्टिच्या पलीकडे असलेल्या क्षितिजापर्यंत जसे पोहोचलेले दिसते आणि सागराची अथांगता किती दूरवर पसरली आहे, जी किना-यावर ऊभे राहून कधीच जाणवत नाही, ह्याची अंशत: जाणीव होते, तसे कांहीसे त्या रागाच्या विस्ताराबद्दल वाटले.

भारतांतील पट्टीच्या ऐकणा-यांसमोर मैफिल करणे निराळे आणि ज्या मैफिलीला "नवशे आणि गवसे" ही असतात, ती जिंकणे महाकर्म कठिण असते. ज्या वेळी संगीत सभेत ईतर देशांतील रसिक मंडळी असतात, भारतीय संगीत शिकणारे इतरदेशीय विद्द्यार्थीही असतात, आणि भारतीय संगीताची केवळ तोंडओळखच झाली आहे असेही असतात, अशा सभेतील संगीताच्या निरनिराळ्या पाय-या असलेल्या रसिकांच्या हृदयापर्यंतचा संगीत "पोहोचविण्याचा" हा कांहीसा खडतर वाटणारा प्रवास रायकर रसिकांना अगदी सहज घडवितात. एव्हढेच नव्हे तर त्या त्या रागांतील अथांगतेची आदरपूर्वक जाणीव रसिकांची कुवत ओळखून घडवितात, तीही अशा पद्धतीने की जेणेकरुन रसिकांना रागाच्या महानतेची कल्पना यावी. त्यांच्या वाजविण्यांत शास्त्रशुद्धता आहे, मात्र शास्त्रांतला रूक्षपणा अजिबात नाही. गायकी ढंगाने व्हायोलिन वाजवितांना त्यातला सुरीलेपणा, सादरीकरणांतला गोडवा कायम राखून शिस्तशिरपणे सादर केलेली रागाची खोली, पल्लेदारपणा हे सारे एकाच वेळी ऐकतांना एका अमोघ अशा भव्यतेची, विशालतेची जाणीव न झाली तरच नवल! आणि म्हणुनच ते सारे अनुभवतांना माधुर्य, मार्दवता आणि तादात्म्यता ह्या सा-या श्रुती-देवता हात जोडून ऊभ्या आहेत आणि स्वर-सुरांचे मन:पूर्वक आणि दोन्ही बाहु ऊभारुन स्वागत करीत आहेत ह्याची रसिकांना हेतुपूर्वक जाणीव होते.

रसिकांना विश्वासांत घेऊन रायकरांनी पुढचा राग कोणता ऐकायला आवडेल असे विचारुन ‘भूप’ सादर केला तो कधी संपूच नये असा वाटला नाही तरच नवल! वाजविण्यांतला नैसर्गिक गोडवा, फिरत, रागातून घडवित असलेले भाव दर्शन, रागाभ्यासाची सखोलता, मैफिल रंगविण्याची हातोटी, आणि गुरुंनी मुक्त हस्तांनी दिलेल्या संगीताच्या शिकवणुकीचे
आदरपूर्वक सादरीकरण अशा एक ना अनेक पैलुंची फुले त्या संध्याकाळी त्यांनी रसिकांवर ऊधळली. हा राग त्यांना गानसरस्वती पद्मविभुषण किशोरीताई आमोणकरांनी खास शिकविला आहे. गायनासारख्या मौखिक कलेमध्ये 'भाव' हा महत्वाचा असतो. मात्र तो व्हायोलिनसारख्या वाद्द्यामधून रसिकांच्या हृदयापर्यंत पोहोचविला गेला तो केवळ किशोरीताईं-सारख्या गुरुच्या प्रसादामुळेच!

पारिजातकाच्या फुलांनी बहरलेल्या, नि प्रत्येक फांदीवरील फुलांच्या लगडलेल्या सुवासाने आसमंत भरुन टाकणा-या एखाद्या फुलझाडाची फुले माळ्याने 'हवी तेव्हढी घ्या' असे सांगितलेले असले की त्या टवटवित फुलांना किती वेचू आणि किती नको असा स्वर्गीय आनंद जसा पुजा-याला वाटतो, तशीच कांहीशी अवस्था रसिकांची झाली होती. ख्यालाच्या आवर्तनाच्या अवकाशात आलाप व्यवस्थित येउन कोणत्या मात्रेपासून परतीचा प्रवास सुरू करावा म्हणजे तो समेवरच चपखल संपेल हे पट्टीचा गायक गातांना बेमालुमपणे सादर करतो, आणि हीच कला तेव्हढ्याच शिताफीने रायकर आपल्या व्हायोलिनच्या तारांवर अगदी सहजतेने करतात-आणि ती देखील कोणतीही कसरत न करतां! त्यांना मिळालेली ही केवळ दैवी देणगी नव्हे तर त्यांच्या गुरूंनी, पद्मश्री पंडीत डी.के. दातारांनी रायकरांना भरभरुन दिलेल्या शिक्षणाचा तो एक अविभाज्य भाग आहे. गुरूजींनी दिलेले शिक्षण हेच आयुष्याचे ध्येय बाळगणा-या शिष्याने अहोरात्र केलेल्या रियाझाच्या तालमीचेच हे फळ होय!

मध्यंतरात कांही मिनिटे विश्रांती घेऊन रायकरांनी रसिकांना अजून तब्बल दोन तास खिळवून ठेवले. रागमाला हा प्रकार ऐकून रसिकांनी सभागृह डोक्यावरच घेतले. एका रागातून दुस-या रागांत आणि तेथून अलगद पुढच्या रागांत शिरण्याचे त्यांचे कसब अजबच होते. सभागृहाची ठरलेली वेळ संपून गेली तरी आयोजक त्यांना कार्यक्रम असाच पुढे चालू ठेवा असा आग्रह करीत होते. त्यांच्या आग्रहास मान देऊन झाल्यानंतर मैफिलीची अखेर, भैरवीच्या सूरांतुन प्रवेशली. तबल्याची कोणत्याही प्रकारची साथ न घेतां त्यांनी भैरवी सादर केली. भैरवीचे कांहीसे विरहाचे स्वर त्यांच्या व्हायोलिन मधून आले आणि आतां मात्र निरोपाची वेळ आली आहे असे सा-यांना प्रकर्षाने जाणवले.

भारतापासून हजारो मैल दूर असलेल्याआणि भाषेच्याही पलीकडे असलेल्या केवळ स्वर-सूरांचच नातं सांगणा-या त्या रसिकांचा निरोप, भैरवीच्या सूरांतुन रायकरांनी घेतला. संगीताचे स्वर आणि सूर! त्यांनीच तर ह्या विश्वाला एकत्र बांधुन ठेवलं आहे नाही कां?

त्यादिवशीची संगीताची ही अविस्मरणीय मैफिल ही एका ऐतिहासिक क्षणाची साक्षीदारही होती. ५ मे, १९०१ ह्या दिवशी पंडीत विष्णु दिगंबर पलुसकर ह्यांनी गांधर्व विद्द्यालयाची स्थापना लाहोर येथे केली. अशा शुभप्रसंगाच्या ११२ व्या वर्षाच्या वर्धापन दिनी मुहुर्त साधुन असा अविस्मरणीय कार्यक्रम सादर करुन मिलिंद रायकरांनी आपल्या गुरुच्या घराण्याला जणू एक मानाची वंदनाच दिली आणि वेळेचे औचित्यही साधले असे म्हंटले तर त्यांत वावगे काय?

श्री. मिलिंद रायकरांची संगीत-सेवा यापुढेही अशीच चालु राहो आणि त्यांची संगीतातली कारकिर्द यशस्वी होवो हीच त्या परमेश्वराकडे प्रार्थना!

**- शशिकांत विष्णु पानट** (लॉस अँजलिस, कॅलिफोर्निया)